**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः12.05.2025** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरमध्ये 100हून अधिक दहशतवादी ठार, दहशतवादी तळ उद्ध्वस्त करणं हेच लक्ष्य असल्याचं लष्कराचं प्रतिपादन
- ऑपरेशन सिंदूर दहशतवादाविरोधातल्या भारताच्या जबरदस्त इच्छाशक्तीचं प्रतीक - संरक्षणमंत्री
- राष्ट्रीय तपास संस्थेकडून खलिस्तानी दहशतवाद्याला बिहारमधून अटक आणि
- खेलो इंडियात महाराष्ट्राचा डंका, 30 सुवर्णपदकांसह 80 पदकांची कमाई

**सैन्य दल पत्रकार परिषद**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातल्या दहशतवादी तळांवर केलेल्या हल्ल्यात 100पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रतिनिधींनी काल दिली. लष्करी कार्यवाही महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई, हवाई कार्यवाही महासंचालक एअर मार्शल ए. के. भारती आणि नौदल कार्यवाही महासंचालक व्हाइस ॲडमिरल ए. एन. प्रमोद यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत भारताच्या हवाई हल्ल्याविषयी आणि त्यानंतरच्या घटनाक्रमाविषयीचे तपशील समोर ठेवले. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये कुख्यात दहशतवादी युसुफ अजहर, अब्दुल मलिक रौफ, मुदस्सिर अहमद यांचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूरचा उद्देश पाकिस्तानातले दहशतवादी तळ उद्ध्वस्त करणं हाच होता, ही बाब भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रतिनिधींनी अधोरेखित केली. या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेजवळ वारंवार झालेला गोळीबार, भारताच्या हद्दीत आलेले असंख्य ड्रोन्स, इतर तत्सम यंत्रं यामुळे भारतानं स्वसंरक्षणासाठी आणि प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानच्या सशस्त्र दलांच्या तळांना लक्ष्य केलं; या कारवाईत पाकिस्तानचे 35 ते 40 जवान मृत्युमुखी पडल्याचंही त्यांनी सांगितलं. दोन्ही देशांमध्ये झालेल्या शस्त्रसंधीनंतर काही तासांतच पाकिस्ताननं पुन्हा सीमेपलीकडून गोळीबार केला; या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून पाकिस्ताननं पुन्हा शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यास त्याला चोख प्रत्युत्तर द्यायचं पूर्ण स्वातंत्र्य लष्कराला दिलं असल्याचंही लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी सांगितलं. भारतानं आत्तापर्यंत केलेल्या कोणत्याही कारवाईचा उद्देश पाकिस्तानी सशस्त्र दलांना किंवा नागरिकांना लक्ष्य करणं हा नव्हता, तर तिथले दहशतवादी तळ उद्ध्वस्त करणं हेच भारताचं लक्ष्य होतं, असं या तिन्ही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

दरम्यान, भारताच्या लष्करी कार्यवाहीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई आणि पाकचे समपदस्थ आज दुपारी 12 वाजता दीर्घकालीन सामंजस्य कराराच्या दृष्टीने चर्चा करणार आहेत. तत्पुर्वी शस्त्रसंधीच्या घोषणेनंतर

केवळ दोन तासांतच पाकिस्ताननं नियंत्रण रेषेपलीकडून गोळीबार आणि ड्रोन घुसखोरी करुन उल्लंघन केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

**राजनाथ ब्राह्मोस**

ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नसून ती देशाची राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक ईच्छाशक्तीचं प्रतीक असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे. ही कारवाई दहशतावादाविरोधातल्या भारताच्या जबरदस्त इच्छाशक्तीचं तसंच लष्करी क्षमता आणि दृढनिश्चयाचं प्रतीक असल्याचं ते म्हणाले. लखनऊ इथं ब्रह्मोस एरोस्पेस एकीकरण आणि परीक्षण सुविधेचं उद्घाटन काल राजनाथ सिंह यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून झालं; त्यावेळी ते बोलत होते.

**बैठक**

भारत पाकिस्तानदरम्यानचा तणाव, पाकिस्तानबरोबर जाहीर केलेली शस्त्रसंधी आणि या शस्त्रसंधीबाबत झालेल्या सामंजस्य कराराचं पाकिस्तानकडून वारंवार होत असलेलं उल्लंघन या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कालही नवी दिल्लीतल्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायू दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी या बैठकीला उपस्थित होते.

**विरोधी पक्षनेते**

दरम्यान, काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून तत्काळ संसदेचे विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी केली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि युद्धविराम या मुद्द्यावर संसदेचे अधिवेश बोलवण्याची विरोधी पक्षांची मागणी पुन्हा एकदा पत्राद्वारे मांडली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही यासंदर्भात पंतप्रधानांना पत्र लिहिले आहे.

**इजिप्त जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर आणि इजिप्तचे समकक्ष बद्र अब्देलट्टी यांच्या दरम्यान दूरध्वनीवरून चर्चा झाली. जयशंकर यांनी देशातल्या अलीकडील घडामोडींविषयी माहिती देताना दहशतवादासंदर्भात शून्य सहनशीलतेच्या महत्त्वावर भर दिला. उभय नेत्यांनी दोन्ही देशांदरम्यान आर्थिक सहकार्याच्या शक्यतांवर चर्चाही केली.

**राष्ट्रीय आपत्ती**

देशातली सद्यपरिस्थिती लक्षात घेता राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण म्हणजेच एनडीएमएनं नागरिकांना सतर्कतेच्या सूचना जारी केल्या आहेत. समाज माध्यमांवरून दिलेल्या संदेशात नागरिकांनी कोणत्याही अज्ञात वस्तूला स्पर्श करु नये. त्यामध्ये स्फोटक धोकायदायक पदार्थ असू शकतात. त्यामुळे लोकांना गंभीर दुखापत होण्याचा धोका असल्याचं एनडीएमए म्हटलं आहे. अज्ञात सामग्री आढळल्यास स्थानिक अधिकाऱ्यांना कळवावे अशाही सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

**एनआयए-अटक**

राष्ट्रीय तपास संस्थेनं परदेशातल्या बब्बर खालसा दहशतवाद्यांशी संबंधित एका प्रमुख खलिस्तानी दहशतवाद्याला अटक केली आहे. मोतिहारी बिहार इथं ही कारवाई झाली. कट रचण्यात सहभाग, खलिस्तानी दहशतवाद्यांच्या साथीदारांना आश्रय देणं, रसद आणि निधी पुरवणं असे आरोप त्याच्यावर आहेत.

**बुद्धपौर्णिमा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त जगभरातील नागरिकांना आणि भगवान बुद्धांच्या अनुयायांना शुभेच्छा दिल्या आहेत. लोकांनी भगवान बुद्धांचे आदर्श त्यांच्या जीवनात स्वीकारावेत आणि शांततापूर्ण, सुसंवादी आणि विकसित राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे अशी राष्ट्रपतींनी इच्छा व्यक्त केली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा पवित्र दिवस भगवान बुद्धांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाणाचे प्रतीक आहे, असं सांगत भगवान बुद्धांचा अहिंसा, दया आणि मध्यममार्गाचा संदेश आजच्या जगात, व्यक्ती आणि संपूर्ण मानवतेसाठी, पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे, असं उपराष्ट्रपतींनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे. बिहारमध्ये बुद्धगया इथं थायलंड, व्हिएतनाम आणि म्यानमार आदी देशांमधून लाखो भाविक बुद्धजयंतीनिमित्त दाखल झाले आहे. महाबोधी मंदिरात यानिमित्ताने विशेष प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**परिचारिका दिन**

आधुनिक नर्सिंगच्या संस्थापक फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या जयंतीनिमित्त आज जगभरात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जात आहे. 'आमच्या परिचारिका-आमचं भविष्य' अशी यंदाच्या दिनाची मध्यवर्ती संकल्पना असल्याचं आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेनं म्हटलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं देखील जगभरातील परिचारिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने 30 सुवर्ण 25 रौप्य आणि 25 कास्य अशी एकंदर 80 पदकांची कमाई करत पदकतालिकेतील अव्वल स्थान कायम राखलं आहे. योगासन स्पर्धेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने पदकांचा चौकार ठोकला. मुलांच्या गटात रोहन तायडे, अंश मयेकर तर मुलींच्या गटात रुद्राक्षी भावे आणि प्रांजलं व्हान्ना या जोड्यानी सुवर्णपदकांवर आपलं नाव कोरलं.

याशिवाय महाराष्ट्राच्या संघाने आणखी दोन रौप्य पदकांची कमाई केली. भारोत्तोलनात सांगलीच्या यश खंडागळेने 67 किलो गटात सुवर्ण पदक मिळवलं. टेनिसमध्ये एकेरीत अर्णव पापरकर, ऐश्वर्या जाधव यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आजपासून ॲथलेटिक्स आणि कुस्ती स्पर्धेचा थरार सुरू होणार असून यातही महाराष्ट्राला पदकांची अपेक्षा आहे.

**तिबेट भूकंप**

भारताचा शेजारी देश तिबेटमध्ये भारतीय प्रमाणवेळेनुसार आज पहाटे पावणेतीनच्या सुमारास 5 पूर्णांक 7 रिख्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसल्याची नोंद झाली. यामध्ये आतापर्यंत जीवित किंवा वित्त हानी झाल्याचे वृत्त नाही. भारताच्या राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्रानुसार भूकंपाचे केंद्र जमिनीखाली 10 किलोमीटर खोल होते.

**हवामान**

देशात पश्चिम बंगाल आणि सिक्कीममधील काही ठिकाणी हवामान विभागानं मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. आसाम मेघालय आणि पंजाबमध्ये गारपीटीसह वादळी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. येत्या सात दिवसांत मध्य भारतात कमाल तापमानात 2-3 अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यताही वेधशाळेनं वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**